POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२७७ ● मुंबई, रविवार, १० मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा धुमाकूळ

## विदर्भात 'ऑरेंज अलर्ट', तर मराठवाड्याला 'यलो अलर्ट'चा इशारा

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत असून, पावसाचा प्रभाव आता अधिक गडद झाला आहे. पश्चिमी विक्षोभामुळे निर्माण झालेल्या वादळी स्थितीमुळे आज (शनिवारी) राज्याच्या बहुतांश भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाने विदर्भातील काही जिल्ह्यांना 'ऑरेंज अलर्ट' तर उर्वरित जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' जारी केला आहे.हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आज विदर्भातील यवतमाळ आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर अधिक असेल. येथे पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला असून, ताशी ५० ते ६० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस आणि गारपिटीची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. राज्याच्या इतर भागात पाऊस असताना कोकण किनारपट्टीवर मात्र नागरिकांना उन्हाचा कडाका सहन करावा लागणार आहे. दक्षिण कोकणात काही ठिकाणी पावसाच्या सरी कोसळत असल्या, तरी उर्वरित भागात उष्ण आणि दमट हवामान कायम आहे. हवामान विभागाने येत्या रविवारपर्यंत कोकणात हीच स्थिती राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. दरम्यान, पावसामुळे सध्या कमाल तापमानात घट झाली असून नागरिकांना उष्णतेपासून तात्पुरता दिलासा मिळाला आहे. मात्र, हा दिलासा फार काळ टिकणारा नाही. येत्या तीन दिवसांत राज्याच्या तापमानात पुन्हा 2 ते 3 अंश सेल्सिअसने वाढ होईल, असा अंदाज हवामान खात्याने दिला आहे. हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार, रविवारपर्यंत राज्यात वादळी पावसाचा प्रभाव राहण्याची शक्यता आहे. तसेच शनिवारीही राज्यातील पावसाचा प्रभाव वाढण्याची शक्यता असून मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' तर ज्या जिल्ह्यांमध्ये पावसाची आणि वादळी वाऱ्यांची तीव्रता अधिक असण्याची शक्यता आहे अशा जिल्ह्यांना 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. महाराष्ट्रात मागील दोन दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावली असून विदर्भ आणि मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये पावसाच्या सरी कोसळल्या. या पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली आहे. अशातच आज पुन्हा हवामान खात्याने काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली या दोन जिल्ह्यांमध्ये आज विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे या जिल्ह्यांसाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. तर दुसरीकडे, सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्येही विजांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राज्याच्या इतर भागांमध्ये ढगाळ वातावरण कायम राहणार असून उन्हाळ्याच्या दिवसांतील तापमान वाढ सुरूच राहील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मराठवाड्यात अवकाळी पाऊस राज्यात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मराठवाड्यातील हवामानात बदल झाला आहे. सोमवारी पहाटे मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, बीड, हिंगोली, नांदेड, परभणी जिल्ह्यांना अवकाळी पावसाने झोडपले. छत्रपती संभाजीनगर, जालना जिल्ह्यांत ढगाळ वातावरण होते. दरम्यान सोमवारी रात्री धाराशिवमध्ये पुन्हा पावसाने हजेरी लावली. लातूर जिल्ह्यात गारपीट झाल्याने पिकांचे नुकसान झाले. सोमवारी सकाळी धाराशिव शहरासह जिल्ह्याच्या विविध भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळल्या. उमरगा तालुक्यातील बहुतांश भागात पावसाने हजेरी लावली. त्याचा जनजीवनावर परिणाम दिसून आला. धाराशिव जिल्ह्यात रब्बीची पिके काढणीच्या अवस्थेत आहेत. त्यात पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. ढगाळ वातावरणामुळे कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार धाराशिव जिल्ह्यात पुढील २४ तासांत पावसाचा अंदाज वर्तविला आहे. लातूर जिल्ह्यातील लातूर, रेणापूर, चाकूर तालुक्यात रविवारी मध्यरात्री व सोमवारी सकाळी पाऊस झाला. रेणापूर तालुक्यात सोमवारी दुपारी चार ते पाचच्या सुमारास गारपीट झाली. वाऱ्यामुळे काही ठिकाणी घरांवरील पत्रे उडून गेले. अवकाळी पावसाने गहू, हरभरा, ज्वारीचे काही प्रमाणात नुकसान झाले. परभणी शहरात गंगाखेड, पालम तालुक्यांतील काही भागात सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. काढणीला आलेल्या रब्बी पिकांना मोठा फटका बसला आहे. सोमवारी सकाळपासून कडक ऊन होते. दुपारी तीनच्या सुमारास सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली.



### महाराष्ट्रात कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये पावसाची हजेरी?

सोलापूर शहरासह, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, वैराग, उत्तर सोलापूर तालुक्यांत सोमवारी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. मैंदर्गी येथे सायंकाळी गारांचा पाऊस झाला. विजांच्या कडकडाट अवकाळी पाऊस पडल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. हवामान विभागाने रविवारीच अवकाळी पावसाचा इशारा दिला होता. सोमवारी पहाटेपासून ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत कमी-अधिक प्रमाणात शहरासह जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. मंद्रुप परिसरात कडक जमिनीवर पाणी वाहील इतका पाऊस पडला. ज्वारी जमीनदोस्त झाल्याने काढणीला आलेल्या कणसांचे मोठे नुकसान झाले आहे. हरभरा पिकाचेही नुकसान झाले आहे.

### 'यलो अलर्ट' जारी

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये शनिवारी अवकाळी पावसाचा प्रभाव दिसून येईल. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर (घाट विभाग), सांगली, सोलापूर, मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड आणि विदर्भातील वाशीम, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा आणि गोंदिया येथे 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

### 'ऑरेंज अलर्ट' जारी

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आज विदर्भातील यवतमाळ आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर अधिक असेल. येथे पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला असून, ताशी ५० ते ६० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे.

### विदर्भालाही बसला फटका

विदर्भातील नागपूर, भंडारा, वर्धा, यवतमाळ आणि गडचिरोली जिल्ह्यात अवकाळी पाऊस झाला. सोमवारी पहाटेच्या सुमारास बरसलेल्या या सरींमुळे रब्बी हंगामातील पिकांचे नुकसान झाले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील काही भागात गारपीट झाल्याने नुकसानीची तीव्रता वाढली आहे. नापिकीला सामोरे जात असतानाच आता हे नवे संकट आल्याने शेतकरी हादरला आहे. नुकसानीचे तत्काळ सर्वेक्षण करून तातडीची भरपाई देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

### ५३४ हेक्टरला फटका

महसूल विभागाने शेतीच्या नुकसानीचा प्राथमिक अंदाज जाहीर केला आहे. यात ५३४ हेक्टरवरील गहू व हरभरा पिकांचे नुकसान झाले. त्यात केळापूर १५ हेक्टर, उमरखेड ६५ हेक्टर, दिग्रस २५० हेक्टर, मारेगाव २०४ हेक्टरवरील नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यासह इतर तालुक्यांतही नुकसानीची पाहणी सुरू आहे.

## अखेर पालिकेत वडाळ्यातील गृहनिर्माण संस्थेचा प्रस्ताव मंजूर; सत्ताधाऱ्यांना ११२ तर विरोधकांना ७९ मते

**■मुंबई। प्रतिनिधी,**

वडाळ्यातील गृहनिर्माण संस्थेचा प्रस्ताव संख्याबळाअभावी सभागृहात मंजूर करणे भाजपला ३० एप्रिल रोजी अशक्य झाले होते. मात्र शुक्रवारी झालेल्या सभागृहात हा प्रस्ताव मतदान घेण्यात आले. यात भाजप-महायुतीला ११२, तर विरोधकांना ७९ मते मिळाली आणि गृहनिर्माण संस्थेचा प्रस्ताव सभागृहात अखेर मंजूर करण्यात आला. वडाळा गृहनिर्माण पुनर्विकास प्रकल्पाचा प्रस्ताव ३० एप्रिलला महापालिका सभागृहाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. यावेळी तातडीचे कामकाज



म्हणून महापौर रितू तावडे यांनी हा प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रयत्न केला. परंतु विरोधकांनी तातडीच्या कामकाजासाठी मतदानाची मागणी केली. यावेळी महापौर यांनी सत्ताधाऱ्यांकडे बहुमत आहे की नाही, याची शहानिशा न करता मतदानाला परवानगी दिली. यात सत्ताधाऱ्यांना उपस्थित नगरसेवकांच्या तीनचतुर्थांश मतदान न झाल्यामुळे त्यांच्यावर प्रस्ताव नामंजूर करण्याची नामुष्की ओढवली. याची गंभीर दखल मुख्यमंत्र्यांनी घेतली आणि पालिकेतील वरिष्ठ नेत्यांची कानउघाडणी केली तर महापौर, सभागृह नेते, स्थायी समिती अध्यक्ष यांची मुंबई भाजप अध्यक्ष साटम यांनी बैठक बोलावली. यावेळी भाजपच्या नगरसेवकांना शिस्तीचे धडे द्या, तातडीचा प्रस्ताव तर सभागृहात उपस्थित राहण्यासाठी व्हीप जारी करा, असे निर्देश साटम यांनी दिले. दरम्यान, मतदानावेळी सत्ताधाऱ्यांच्या बाजूने ११२ मते पडली तर विरोधकांच्या बाजूने ७९ मते पडली. पालिकेमध्ये २२७ नगरसेवकांना मतदानाचा अधिकार आहे. परंतु भाजपच्या नगरसेविका अलका केरकर यांचे निधन झाल्यामुळे सभागृहात २२६ नगरसेवक आहेत. या सत्ताधारी भाजप-शिवसेनेचे १२१, तर विरोधकांचे १०५ नगरसेवक आहेत. पण मतदान प्रक्रियेच्या वेळी सत्ताधारी पक्षाचे ९ नगरसेवक व विरोधकांचे २६ नगरसेवक अनुपस्थित होते.

## जिल्हा बँकांमधील ७० टक्के जागा आता भूमिपुत्रांसाठी राखीव



**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकरभरती प्रक्रियेत आता स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येणार आहे. भूमिपुत्रांसाठी ७० टक्के जागा राखीव ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला असून, सहकार विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयामुळे संबंधित जिल्ह्यातील तरुणांना आपल्या जिल्ह्यातच रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होणार आहेत. नवीन नियमांनुसार, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यक्षेत्रातील मूळ रहिवासी उमेदवारांसाठी भरतीतील ७० टक्के जागा राखीव असतील. उर्वरित ३० टक्के जागांवर इतर जिल्ह्यांतील उमेदवारांना संधी दिली जाईल. पदभरतीची जाहिरात प्रसिद्ध करताना बँकांना या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक असणार आहे. राज्यात सध्या ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कार्यरत आहेत. या सर्व बँकांना आता नव्या धोरणानुसार भरती प्रक्रिया राबवावी लागणार आहे. सरकारच्या या निर्णयामुळे ग्रामीण भागातील युवकांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होण्यास मदत होणार असून, शेजारील जिल्ह्यांतील उमेदवारांनाही ३० टक्के खुल्या कोट्यात अर्ज करण्याची संधी मिळणार आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार मानल्या जातात. विविध कार्यकारी सेवा सोसायट्या, तालुका सहकारी संस्था, शेतकरी पतसंस्था या बँकांशी जोडलेल्या असतात. पीक कर्ज वितरण, शेतीसंबंधी आर्थिक मदत आणि ग्रामीण बँकिंग व्यवस्थेत या बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

## ठाणे ते मुलुंड रेल्वे स्थानकांदरम्यान उभारण्यात येणाऱ्या नव्या स्थानकाला अखेरीस ग्रीन सिग्नल

**■ठाणे । प्रतिनिधी,**

ठाणे आणि मुलुंड रेल्वे स्थानकादरम्यान नवीन रेल्वे स्थानकाच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. मुलुंड आणि ठाणे दरम्यान नवीन उपनगरीय रेल्वे स्थानकाच्या बांधकामाला रेल्वे मंत्रालयाने तत्त्वतः मंजुरी दिली असल्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे एक पत्र सोशल मीडियावर शेअर करत ही माहिती दिली आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी शासकीय मनोरुग्णालयाच्या जागेवर उपनगरीय रेल्वे स्थानक विकसित करावे, अशी स्थानिक राजकीय नेत्यांची बऱ्याच काळापासूनची मागणी होती. मुख्यमंत्री फडणवीस यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात, वैष्णव यांनी सांगितले की, प्रस्तावित स्थानकाला तात्काळ मंजुरी देण्यात आली असून यामुळे मुंबई महानगर प्रदेशातील कनेक्टिव्हिटीला नवी चालना मिळेल, असे मुख्यमंत्र्यांनी ह्यएक्सह्नवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे आणि या मंजुरीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी व वैष्णव यांचे आभार मानले आहेत. नवीन स्थानकामुळे घोडबंदर रोड, पोखरण रोड आणि वागळे इस्टेट परिसरातील प्रवाशांना फायदा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अधिकृत अंदाजानुसार, यामुळे ठाणे आणि मुलुंड स्थानकांवरील गर्दी अनुक्रमे 31% आणि 24% ने कमी होऊ शकते. सध्या ठाणे स्थानकावरून दररोज बारा लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करत असतात. सकाळी अप मार्गावर तर संध्याकाळी डाउन मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना भरपूर जोखमीने प्रवास करावा लागत असतो. ठाणे रेल्वे स्थानक मध्य रेल्वे मार्गावरील वर्दळीत आणि व्यस्त रेल्वे स्थानक आहे.

## एकीकडे मराठी सक्तीसाठी प्रयत्न, तर दुसरीकडे राज्यातील 94 हजार विद्यार्थी मातृभाषेत नापास

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मागील वर्षी जुलै महिन्यात हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून वातावरण तापले होते. त्यामुळे महायुती सरकारने हिंदी भाषा सक्तीचा शासन निर्णय रद्द करत हे तापलेले वातावरण निवळण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अलिकडेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महाराष्ट्रातील रिक्षा व टॅक्सी चालकांना 1 मे पासून मराठी सक्ती केली आहे. मात्र प्रताप सरनाईक यांच्या या निर्णयाविरोधात अनेक संघटनांनी आवाज उठवल्यावर त्यांनी रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी 15 ऑगस्टपर्यंतची मूदत दिली आहे. एकंदरीत राज्यात मराठी सक्तीसाठी प्रयत्न होताना दिसत आहे. मात्र आज (08 मे) जाहीर दहावीच्या निकालात तब्बल 94 हजार विद्यार्थी आपल्या मातृभाषेत म्हणजे मराठी विषयात नापास झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून आयोजित करण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज सकाळी 11 वाजता जाहीर करण्यात आला. या परीक्षेत राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण 15 लाख 55 हजार 026 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी 15 लाख 42 हजार 472 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आणि त्यातील 14 लाख 20 हजार 486 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी 92.09 एवढी असून गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा उत्तीर्ण होण्याचा टक्का 2 टक्क्यांनी घसरला आहे. मात्र दहावीच्या परीक्षेतील एकूण 35 विषयांपैकी 12 विषयांचा निकाल 100 टक्के लागला आहे. महत्त्वाचे म्हणजे 100 टक्के निकाल लागणाऱ्या शाळांचीही संख्या वाढत चालली आहे. ही बाब आनंदाची असली तरी मराठी भाषेत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही मोठी आहे. एकीकडे आपल्या राज्याची मातृभाषा मराठी आहे. तर दुसरीकडे केंद्र सरकारकडून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. असे असतानाही जर राज्यातील जवळपास 94 हजार विद्यार्थी नापास होत असतील तर यानिमित्ताने मराठी विषयाची अनास्था या निमित्ताने उघड झाली आहे.




### जवळपास 94 हजार विद्यार्थी मराठी भाषेत नापास

समोर आलेल्या माहितीनुसार, प्रथम भाषा म्हणून राज्यातील सुमारे 10 लाख 87 हजार 699 विद्यार्थ्यांनी मराठी विषयाची निवड केली होती. मात्र यापैकी तब्बल 80 हजार 803 विद्यार्थी नापास झाले आहेत. म्हणजेच प्रथम भाषा घेऊन मराठी विषयात जवळपास 8 टक्के विद्यार्थी नापास झाले आहेत. तर द्वितीय आणि तृतीय भाषा म्हणून राज्यातील एकूण 4 लाख 13 हजार 917 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यापैकी 13 हजार 741 विद्यार्थी नापास झाले आहेत. म्हणजेच राज्यातील 13,917 विद्यार्थी मराठी विषयात नापास झाले आहेत.

## पंजाबमध्ये 'आप'ला मोठा धक्का! मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात मंत्री संजीव अरोरा यांना ईडीकडून अटक

**■पंजाब। प्रतिनिधी,**

पंजाबच्या राजकारणात शनिवारी मोठी राजकीय घडामोड घडली असून, पंजाब सरकारमधील मंत्री आणि आम आदमी पार्टीचे नेते संजीव अरोरा यांना अंमलबजावणी संचालनालयाने मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अटक केली आहे. दीर्घ चौकशी आणि छापेमारीनंतर ईडीने ही कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळपासून ईडीने संजीव अरोरा यांच्याशी संबंधित विविध ठिकाणी छापेमारी सुरू केली होती. या कारवाईदरम्यान महत्त्वाची कागदपत्रे, आर्थिक व्यवहारांची माहिती आणि काही इलेक्ट्रॉनिक उपकरणांची तपासणी करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. तसेच काही संबंधित व्यक्तींनाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. अनेक तासांच्या चौकशीनंतर ईडीने अखेर अरोरा यांना अटक केली. भगवंत मान यांचा केंद्र सरकारवर निशाणा या कारवाईपूर्वी पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी पत्रकार परिषद घेत केंद्र सरकार आणि भाजपवर जोरदार टीका केली. विरोधी पक्षांच्या नेत्यांना लक्ष्य करण्यासाठी ईडी आणि सीबीआयसारख्या केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. ह्लराजकीय हेतू साध्य करण्यासाठी केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर सुरू आहे. विरोधी पक्षातील नेत्यांवर दबाव आणण्याचा आणि त्यांना घाबरवण्याचा प्रयत्न केला जात आहे,ह्व असे भगवंत मान यांनी



म्हटले. दरम्यान, मनीष सिसोदिया यांनीही सोशल मीडियाच्या माध्यमातून केंद्र सरकारवर टीका केली. ईडीच्या डायरेक्टरपासून चपराशापर्यंत सर्वांना पंजाबमध्ये पाठवण्यात आले आहे. मात्र पंजाब झुकणारा नाही,ह्व असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.




संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## ज्येष्ठ नागरिकांचे जगणे अवघड !

राष्ट्रीय गुन्हे नोंदणीच्या अहवालाची ताजी आकडेवारी नुकतीच समोर आली आहे. ही आकडेवारी देशातील ज्येष्ठ नागरिकांच्या चिंतेत भर घालणारी म्हणावी लागेल. या मागचे कारण म्हणजे मागच्या काही वर्षांमध्ये ज्येष्ठ नागरिक वाढत्या गुन्हेगारीचा बळी ठरू लागले आहेत. प्रत्येक राज्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित गुन्हे वाढत आहेत. त्यातही महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिकांसाठी अधिकाधिक असुरक्षित होत चालले असून, ज्येष्ठांच्या संदर्भात देशात दुर्सया क्रमांकाचे गुन्हे महाराष्ट्रात घडणे हे राज्याच्या कायदा-सुव्यवस्थेसाठी नक्कीच अशोभनीय आहे. ‘एनसीआरबी’च्या आकडेवारीनुसार २०२४ मध्ये देशात ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांशी निगडित एकूण ३१,०६७ गुन्हे दाखल झाले होते. २०२३ मध्ये हाच आकडा २६,३०६ इतका होता. म्हणजेच केवळ वर्षभरात ज्येष्ठ नागरिकांशी निगडित गुन्ह्यात सुमारे १७ टक्क्यांनी वाढ झाली. याच काळात मध्य प्रदेशमध्ये ज्येष्ठांशी संबंधित ५, ८७५ गुन्हे, तर महाराष्ट्रात ४, ९१८ गुन्ह्यांची नोंद झाली. शहरांचा विचार केल्यास देशात दिल्लीपाठोपाठ मुंबई ज्येष्ठांसाठी असुरक्षित बनली आहे. ‘एनसीआरबी’कडून दरवर्षी विविध प्रकारच्या गुन्ह्यांची आकडेवारी जाहीर केली जाते. या आकडेवारीत गुन्ह्यांचे प्रकार आणि गुन्ह्यांशी संबंधित व्यक्तीचे लिंग व वयाची माहितीदेखील दिलेली असते. या आकडेवारीचे पृथ्थकरण केल्यानंतर समाजातला नेमका कुठला घटक गुन्हेगारीचा बळी ठरतो आहे आणि त्यामागचे कारणही चकटन लक्षात येते. ज्येष्ठ नागरिकांशी निगडित गुन्ह्यांबाबत सांगायचे झाल्यास त्यांचे एकटे राहणे हे गुन्हेगारीला बळी पडण्यामागचे मोठे कारण असल्याचे तज्ज्ञ नमूद करतात.बदलत्या काळानुसार भारतातही संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होऊन विभक्त कुटुंब पद्धतीला महत्त्व प्राप्त झाले आहे. कधीकाळी एकाच घरात किंवा वाडीत आई-वडील, आजी-आजोबा, काका-काकू, आत्या, चुलत भावंडे व इतर नातेवाईक रहायचे. प्रत्येक गोष्ट एकमेकांना सांगितली वा विचारली जायची, एकमेकांच्या सल्ल्याने निर्णय घेतले जायचे. कुटुंबातील सदस्य एकमेकांच्या अडीअडचणीच्या वेळी धावून यायचे. एकमेकांना मानसिक, सामाजिक, आर्थिक सर्वच प्रकारचा आधार दिला जायचा. परंतु आता नवा संसार थाटण्याआधीच मुले विभक्त होण्याची स्वप्न बघू लागतात. आई-वडिलांपासून वेगळे राहण्यामागे निर्णय स्वातंत्र्य, वडीलधार्यांचा हस्तक्षेप नको, वादविवादापासून चार हात लांब राहण्याची भूमिका असते. तसे बघायला गेल्यास दोन्ही कुटुंब पद्धतीचे आपापले फायदे आणि तोटे आहेत. त्यातल्याच एका तोट्याचा ज्येष्ठ नागरिकांना फटका बसतो आहे. प्रामुख्याने महानगरांमध्ये ज्येष्ठ नागरिक वा वयोवृद्ध जोडपे एकटे रहातात. यातील काही पेन्शनर असतात, तर काहींनी वेगवेगळ्या ठिकाणी आर्थिक गुंतवणूक केलेली असते. वाढलेल्या वयामुळे त्यांना बँकेचे किंवा इतर आर्थिक व्यवहार करताना बयाचदा इतरांची मदत घ्यावी लागते. उदाहरणार्थ बँकेतून रोकड काढण्याची किंवा टाकण्याची स्लीप भरणे किंवा एटीएममधून रोकड काढताना त्यांची अनेकदा धांदल उडते. यावेळी मदत करणारा सद्गृहस्थ असला तर ठिक अन्यथा कुठल्याही चोर भामट्याकडून त्यांची फसवणूक झालीच म्हणून समजा. अनेकदा तर मोठी रोकड सांभाळून घरी आणेपर्यंत त्यांचा श्वास वर खाली होत असतो. एखाद्या चोराने वाटेत गाठून बॅग हिसकावू नये अशी धास्ती त्यांना सतत वाटत असते. एकटेपणाची भीती त्यांच्या मनात घर करुन बसलेली असते. आता बहुतांश ज्येष्ठ नागरिकांच्या हाती जुन्या फिचर फोनऐवजी स्मार्ट फोन आलेत. सायबर चोरांसाठी तर हे स्मार्टफोन म्हणजे ज्येष्ठांची बँक खाती रिकामी करण्याचे साधनच बनले आहेत. कधी केवायसीच्या बहाण्याने, तर कधी जीपेचा ओटीपी क्रमांक मागून, कधी लॉटरीत जिंकल्याचे सांगून, तर कधी डिजिटल अरेस्टच्या नावाने ज्येष्ठ नागरिकांना धमकावून त्यांचे पैसे लुबाडले जात आहेत. एकटे राहणारे ज्येष्ठ नागरिक गुन्हेगारांचे सॉफ्ट टार्गेट ठरतात. बहुतेक ज्येष्ठांकडे साफसफाईसाठी, जेवण बनवण्यासाठी किंवा केअर टेकर म्हणून घरगडी ठेवलेले असतात. हे घरकामगार देखील ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करण्यात पटाईत असतात. घरामध्ये चोरी करणे, इतर वेगवेगळ्या प्रकारे त्यांची आर्थिक फसवणूक करण्याच्या गुन्ह्यांमध्ये घर कामगार मुख्य आरोपी असल्याचे आढळून आले आहे.अनेकदा तर ज्येष्ठ नागरिक त्यांच्या हिंसेलाही बळी पडतात. अनेक प्रकरणांमध्ये घरात एकटे राहर्णाया ज्येष्ठ नागरिकांच्या हत्याही झाल्या आहेत. पैशांसाठी घरातील कामगारानेच ज्येष्ठ नागरिकांचा खून केल्याचे प्रकारही घडले आहेत. ज्येष्ठ नागरिकांना फसवर्णायांमध्ये प्रामुख्याने त्यांच्या ओळखीचेच लोक जास्त असतात. कधी ते घर कामगार असतात, कधी नातेवाईक, ओळखीचे किंवा कधी स्वतःचीच मुले असतात. या लोकांकडून ज्येष्ठ नागरिकांच्या असहायतेचा फायदा उचलला जातो. मध्यंतरी देशातील एका मोठ्या उद्योगपतीने सर्व संपत्ती आपल्या मुलाच्या नावावर केली होती. मात्र, काही महिन्यातच मुलाने वडिलांना घरातून बाहेर काढल्याने त्यांना मरेपर्यंत भाड्याच्या घरात राहावे लागले. अशा अनेक घटना आपल्या आजूबाजूला घडत असतात. परिणामी ज्येष्ठांना उतारवयात हलाखीचे जीवन जगावे लागते. ज्येष्ठांवरील वाढत्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर ठाणे पोलिसांनी एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला होता. महानगरातील सर्व सोसायट्यांमध्ये एकटे व जोडप्याने राहर्णाया ज्येष्ठ नागरिकांची यादी पोलिसांनी बनवली आणि या यादीच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांना वेळोवळी भेटून त्यांच्या अडीअडचणी समजून घेण्यास सुरुवात केली. त्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात एक स्वतंत्र पथक निर्माण करण्यात आले. अशा प्रकारे ठाण्यात गेल्या वर्षभरात ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी शंभरहून अधिक बैठका घेतल्या. त्यात 9 हजार ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला. खरे तर असे उपक्रम देशभरात राबवण्याची गरज आहे. यातून ज्येष्ठांना सुरक्षेसोबत मानसिक आधारही मिळू शकेल. ज्या समाजात लहान मुली, महिला, ज्येष्ठ नागरिक सुरक्षित तोच समाज सुसंस्कृत म्हणायला हवा.

# आमच्या संधी मारल्या ही मतलबी ओरड कशासाठी?

खुल्या वगार्तील लोकांची (मुस्लिम धरून) लोकसंख्या अंदाजे २५ टक्के. म्हणजे, या २५ टक्के खुल्या वगार्तील लोकांना ९८ टक्के रोजगार उपलब्ध आहेत, तर ७५ टक्के बहुजनांना फक्त २ टक्के. मग आमच्या संधी मारल्या ही मतलबी ओरड कशासाठी? आरक्षणांतर्गत उपवर्गीकरणाच्या चचेर्ने महाराष्ट्रात सध्या उग्र स्वरूप धारण केले. अनुसूचित जातीतल्या संख्येने मोठ्या असलेल्या दोन जाती उपवर्गीकरणाच्या विरोधात आणि बाजूने, विविध माध्यमांमध्ये एकमेकांवर अत्यंत त्वेषाने तुटून पडत आहेत. उपवर्गीकरणावरून भांडणाऱ्या या जातींना हे दाखवून देणे गरजेचे आहे की ते नक्की किती टक्क्यांसाठी आणि का भांडत आहेत. त्यासाठी सध्या अस्तित्वात असलेला अनुसूचित जातींसाठीच्या आरक्षणाचा रोजगारातील खरा टक्का किती आहे ते समजून घेतले पाहिजे.

इथल्या जातिवादी व्यवस्थेने शतकानुशतके पशुपेक्षाही हीन असे अस्पृश्यतेचे जीवन ज्या लोकांवर लादले त्या महाराष्ट्रातील पूर्वास्पृश्य ५९ जातींना व्यवस्थेत प्रतिनिधित्व, संधी, न्याय देण्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात, म्हणजे १३ टक्के आरक्षण संविधानाने लागू केले. हे आरक्षण फक्त सरकारी क्षेत्रातच उपलब्ध आहे. सरकारी क्षेत्रात आरक्षणाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार असलेल्या यंत्रणेवर कट्टर आरक्षण-विरोधकांचा ताबा राहिल्याने अनुसूचित जातींच्या (खरे तर आरक्षणाच्या सर्वच लाभधारक जातींच्या) लोकांसाठी असलेल्या आरक्षणाची अंमलबजावणी करताना त्यांचा दृष्टिकोन कायम पूर्वग्रहदूषित राहिलेला आहे. तसेच, शक्यतो या जागा भरल्याच जाऊ नयेत किंवा कमी भरल्या जाव्यात यासाठी त्यांच्या लटपटी चालू असतात, हे वेळोवेळी उजेडात आलेल्या बॅकलॉगच्या मोठ्या आकड्यांवरून लक्षात येते.

एकेकाळी रोजगाराच्या बाबतीत समृद्ध असलेले सरकारी क्षेत्र १९९१ साली आलेल्या ‘खाउजा’ धोरणामुळे आक्रसू लागले. २०१४ साली सत्तेत आलेल्या संघ पुरस्कृत भाजप सरकारने तर सरकारी उपक्रम, उद्योग विकण्याचा, सरकारी कामांचे कंत्राटीकरण, आऊटसोर्सिंग करण्याचा सपाटाच लावल्यामुळे हे क्षेत्र एवढे रोडावले आहे की सध्या या सरकारी क्षेत्रातील रोजगाराचा एकूण रोजगारात वाटा उरला आहे अंदाजे चार टक्के. उर्वरित ९६ टक्के रोजगार खासगी क्षेत्रात आहेत.

सरकारी क्षेत्रातील रोजगारांपैकी निम्मा म्हणजे ५० टक्के रोजगार आरक्षित (अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी आणि अन्य) असतो, कारण सर्वोच्च न्यायालयाने इंदिरा साहनी खटल्यातील निर्णयानुसार आरक्षणावर ५० टक्क्यांची मयार्दा घातलेली आहे. उर्वरित ५० टक्के रोजगार खुल्या वगार्साठी असतो. याचा अर्थ, एकूण रोजगाराच्या तुलनेत या चार टक्के असलेल्या सरकारी रोजगारात दोन टक्के आरक्षित आणि दोन टक्के खुल्या प्रवगार्साठी असे प्रमाण पडते. त्यात अनुसूचित जातींसाठी १३ टक्के आरक्षण आहे. म्हणजे एकूण रोजगारात ५९ अनुसूचित जातींसाठी राखीव जागा आहेत फक्त ०.५२ टक्का. यावरून हे स्पष्ट होते की १३ टक्के लोकसंख्या असलेल्या अनुसूचित जातींना प्रतिनिधित्व, संधी, न्याय वगैरे देण्यासाठी रोजगार उपलब्ध आहे फक्त ०.५२ टक्के. मग साधे अंकगणित मांडले तर प्रश्न असा पडतो, हा सध्याचा ०.५२ टक्का रोजगार अनुसूचित जातींना त्यांच्या १३ टक्के लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व, संधी, न्याय वगैरे देतो का? हा आकडा एवढा कमी का? यातून आरक्षणाचा उद्देश कसा सफल होणार?




या सरकारी क्षेत्रातल्या आरक्षित जागांवर अनुसूचित जातींचे लोक येऊ नयेत म्हणून की काय, नोकर भरती जवळपास बंद किंवा अत्यल्प प्रमाणात होत असल्याने नवीन रोजगार फारसे उपलब्ध नाहीत. याशिवाय आरक्षण हा जुलमाचा रामराम वाटत असल्याने बऱ्याच आरक्षित जागा जाणीवपूर्वक रिक्त ठेवल्या जातात. त्यामुळे या जागांचा बॅकलॉग मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. म्हणून, प्रत्यक्षात ०.५२ टक्क्यापेक्षा कमीच रोजगार अनुसूचित जातींच्या लोकांना मिळालेला आहे असे म्हणता येते.

आरक्षण केवळ सरकारी क्षेत्रातच असल्याने हा ०.५२ टक्के आकडा लोकसंख्येच्या प्रमाणात अत्यंत तोकडा आहे. त्यामुळे आरक्षणाचा जो लाभ मिळतो तो पुरेसा असूच शकत नाही. मग खुल्या वगार्तील अनेक विचारवंतांना त्यांचा पुळका येतो आणि मग क्रिमिलेयर लावा, आरक्षणांतर्गत आरक्षण आणा, अशा सूचना ते करतात. त्यांना जर अनुसूचित जातींना प्रतिनिधित्व द्यावे, संधी द्यावी, न्याय द्यावा असे प्रामाणिकपणे वाटत असेल तर हे आरक्षण खासगी क्षेत्रातही लागू करा, अशी मागणी ते का करीत नाहीत? या जातींवर अस्पृश्यता लादून त्यांना पशुतुल्य जीवन देऊन शतकानुशतके त्यांचे शोषण करण्याचे पाप केले ते इथल्या जाती-आधारित भेदभावाचा उघड पुरस्कार करणाऱ्या धार्मिक व्यवस्थेने. मग वंचितांना प्रतिनिधित्व, संधी किंवा न्याय देण्याची जबाबदारी फक्त सरकारवर टाकणे आणि स्वतःची जबाबदारी झटकणे ही या व्यवस्थेतील जातिवादी लोकांची लबाडी आहे.

या सामाजिक पापाचे प्रायश्चित्त घेण्याऐवजी जातिवादी लोक आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या लोकांचा विविध माध्यमांतून दुष्प्रचार करून त्यांचा सतत तिरस्कार करत राहतात. यांच्यामुळे मेरीट मारले जाते, ३५ टक्केवाले ‘सरकारचे जावई’ साहेब बनतात आणि ९० टक्केवाले मागे पडतात, यांच्या इंजिनिअरने बांधलेले पूल कोसळतात, याच्या डॉक्टरच्या हातून पेशंट मरतात, आरक्षणामुळे देश बरबाद झाला, आमच्या संधी मारल्या.... अशा अथार्चे निराधार विद्वेषी संदेश व्हायरल करून हा तिरस्कार आणि जातिवाद सतत तेवत ठेवतात. हद्द म्हणजे हा जातिभेद त्यांनी परदेशात देखील नेला आहे आणि कॅलिफोर्निया राज्यात जातिभेदविरोधी कायदा पारित करण्याची वेळ आणली आहे.


बरे, यांच्या रोजगाराच्या किती संधी पूर्वास्पृश्य लोकांनी मारल्या असाव्यात? वर वर्णन केल्याप्रमाणे केवळ ०.५२ टक्के. या मेरीटधारी वगार्साठी ९६ टक्के रोजगार असलेले खासगी क्षेत्र उपलब्ध आहे. उर्वरित चार टक्के सरकारी क्षेत्रातील रोजगारातले निम्मे म्हणजे २ टक्के यांना उपलब्ध आहे. लॅटरल एंट्री आहे. असे एकूण रोजगारात ९८ टक्के रोजगार यांना उपलब्ध आहेत. आता लोकसंख्येच्या प्रमाणात विचार केला तर बहुजनांची लोकसंख्या (जात आधारित जनगणना न झाल्याने अंदाजे आकडे) अंदाजे ७५ टक्के आहे, तर खुल्या वगार्तील लोकांची (मुस्लिम धरून) लोकसंख्या अंदाजे २५ टक्के. म्हणजे, या २५ टक्के खुल्या वगार्तील लोकांना ९८ टक्के रोजगार उपलब्ध आहेत, तर ७५ टक्के बहुजनांना फक्त २ टक्के. मग आमच्या संधी मारल्या ही मतलबी ओरड कशासाठी?

हे वास्तव खुल्या वगार्तील लोकांना माहिती असूनही आरक्षणविरोधात रान उठवले जाते, कारण बहुजन वर्ग लगेच प्रतिक्रियावादी बनून या दोन टक्के जागांचा बचाव आक्रमकपणे करतो आणि त्यातच गुंतून पडतो. हेच तर खुल्या वगार्तील लोकांना हवे आहे. तुम्ही दोन टक्क्यांत अडकून बसा आम्ही इकडे ९८ टक्क्यांचा उपभोग घेतो असे हे मायाजाल टाकलेले आहे.

हल्ली चर्चेत असलेले उपवर्गीकरण प्रकरण याच मायाजालाचा, फोडा आणि झोडा नीतीचा एक भाग आहे. उपवर्गीकरण चर्चा सुरू झाल्यापासून अनुसूचित जाती आपापसात त्वेषाने भांडत आहेत. कशासाठी? एकूण रोजगारातील ०.५२ टक्क्यांतील आपल्या वाट्याला किती येईल यासाठी. आपल्याला मुळात प्रतिनिधित्वच अत्यंत क्षुल्लक आहे, ते लोकसंख्येच्या प्रमाणात नसून आपल्याला गृहीत धरले जात आहे याचा त्यांना गंधही नाही.

विशेष बाब म्हणजे हे तिरस्काराचे धनी असलेले बहुजन बांधव हिंदूच आहेत. गेल्या दहाबारा वर्षांपासून धर्म प्रचंड ‘धोक्यात’ आल्याने तो वाचवण्यात हे बांधव गुंतलेले आहेत म्हणून आपल्या ‘प्रतिनिधित्वाच्या खऱ्या टक्क्याचा’ विचार करायला त्यांना वेळ नसावा.

# वाद आणि वस्तुस्थिती






गोविंद पानसरे यांच्या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाच्या प्रकाशकाला शिवसेनेच्या शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी धमकी दिली. यानंतर गायकवाड यांनी दिलगिरी व्यक्त केली. या घटनेमुळे विचारस्वातंत्र्य आणि इतिहासाच्या अर्थांतराचा वाद पुन्हा चर्चेत आला आहे. शिवाजी महाराजांचे चरित्र सर्वसमावेशकपणे मांडणाऱ्या या पुस्तकावर बंदी घालण्याची मागणी चुकीची आहे. इतिहास वस्तुनिष्ठपणे अभ्यासणे आवश्यक आहे.

अलीकडेच गोविंद पानसरे लिखित ‘शिवाजी कोण होता?’ या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना दूरध्वनीवरून अश्लील शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी शिवसेनेच्या शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी अखेर दिलगिरी व्यक्त केली. आमदार गायकवाड यांनी प्रशांत आंबी यांना अर्वाच्य भाषेत केलेली शिवीगाळ आणि दिलेली धमकीची यांची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर गायकवाड यांच्यावर टीकेची झोड उठली होती. गायकवाड यांनी काही वादग्रस्त विधाने करण्याची ही पहिली वेळ नव्हे; याआधीही त्यांनी वादग्रस्त विधाने केली आहेत. मात्र, या धमकीच्या प्रकाराने राज्यभर मोठी खळबळ उडाली.

गोविंद पानसरे हे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विचारवंत होते. त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामान्य जनतेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास पोहोचवला. सन २०१५मध्ये पानसरे यांची हत्या करण्यात आली. ही हत्या म्हणजे महाराष्ट्रातील विचारवंतांवरील हल्ल्यांच्या मालिकेतील एक दुःखद अध्याय ठरला. शिवाजी कोण होता? या अवघ्या ७४ पानांच्या पुस्तिकेतून पानसरे यांनी छत्रपती शिवरायांचे एक वेगळे, सर्वसामान्यांचे राजा म्हणून व्यक्तिमत्त्व उभे केले आहे. हे पुस्तक १९८८मध्ये प्रथम लोकवाङ्मय गृह या प्रकाशन संस्थेकडून प्रकाशित झाले होते. नंतर ते प्रशांत आंबी यांनी प्रकाशित केले. महाराष्ट्रात ते मोठ्या प्रमाणावर वाचले जाते. या पुस्तकाच्या दीड लाखांहून अधिक प्रती आजवर विकल्या गेल्या आहेत. हे पुस्तक शिवाजी महाराजांची एक धर्मनिरपेक्ष प्रतिमा मांडते. पुस्तक व्यापकपणे वाचले जाते, हेच त्या पुस्तकातील विचारांना मिळणाऱ्या लोकांच्या सकारात्मक प्रतिसादाचे लक्षण आहे.पानसरे यांनी शिवाजी महाराज ांबद्दलच्या सर्व समज-गैरसमजांना सज्जड पुराव्यानिशी छेद देत हा जाणता राजा कसा सर्व समाजाचा आणि विशेषतः सर्वसामान्य जनतेचा राजा होता, ते दाखवून दिले आहे. शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आणि भारताचे सांस्कृतिक प्रतीक आहेत. त्यांचे योगदान युद्ध, प्रशासन, नौदल आणि सामाजिक न्याय या सर्व क्षेत्रांत आहे. या पुस्तकात शिवाजी महाराज सर्वधर्मसमभावी, शेतकरी-कामगारांचे राजे होते, हे ठळकपणे अधोरेखित करण्यात आले आहे. हेच या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे, आणि हाच त्यावर वाद होण्यामागचा मुख्य मुद्दाही आहे. खरे बघायला गेले तर हा वाद पुस्तकाच्या शीर्षकाबद्दल नाहीच, तो महाराष्ट्रातील विचारस्वातंत्र्य, इतिहासाचे अर्थांतर आणि राजकीय भूमिकांबद्दल आहे.

याआधी प्रा. मृणालिनी आहेर प्रकरणामुळे २०२४मध्ये या पुस्तकावरील वादाने डोके वर काढले होते. सातारा येथील प्राध्यापक मृणालिनी आहेर यांनी रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयात शिवाजी कोण होता?या पुस्तकाचा संदर्भ दिला म्हणून सातारा पोलिसांनी त्यांच्यावर बेकायदा कारवाईचा बडगा उगारला. राज्य सरकारने या कारवाईचे समर्थन केले. परंतु, उच्च न्यायालयाने मात्र अलीकडेच या न्यायालयाने यावर निकाल देताना राज्य सरकार व पोलिसांवर कडक ताशेरे ओढले आणि ‘ही कसली लोकशाही? तुम्हाला कायदा कळतो का?’ असा सवाल केला. हे प्रकरण महाराष्ट्रातील अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील वाढत्या दबावाचे प्रतीक ठरले.

आमदार संजय गायकवाड यांनी कोल्हापूरचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना रात्री फोन केला आणि धमकी दिली. ‘तुमचेही पानसरेंसारखेच हाल होतील’ असे म्हणत त्यांनी पुस्तकाचे शीर्षक आक्षेपार्ह असल्याचा आरोप केला. या विधानाचा अर्थ काय घ्यावा? एका आमदाराने अशी हिंसक धमकी दिल्याबद्दल लगेच फौजदारी कारवाई अपेक्षित होती; ती अद्याप झालेली नाही. हे प्रकरण केवळ माफी मागून संपविण्याचा प्रयत्न केला जात आहे, तेही अयोग्य आहे.

या पुस्तकात इतिहासाची मोडतोड केल्याचा आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख करून त्यांची प्रतिमा मलीन केल्याचा आरोप करण्यात आला. त्यावर पुरोगामी संघटनांनी, हे पुस्तक छत्रपतींचा ‘लोकराजा’ म्हणून इतिहास मांडत असल्याचे सांगून यावर बंदी घालण्यास विरोध केला आहे. यातली वस्तुस्थिती ही आहे की ‘शिवाजी’ हा शब्द म्हणजे एकेरी उल्लेख नाही. पुस्तकाचे शीर्षक बदलण्याची मागणी करणे, पानसरे यांच्याकडून त्यांच्या तसाच उल्लेख करण्याची अपेक्षा करणे किंवा तशी जबरदस्ती करणे आणि या मागणीला लोकप्रतिनिधींकडून पाठिंबा मिळणे चुकीचे आहे. भारतीय इतिहासात आपले नाव अजरामर करणाऱ्या शिवाजी महाराजांच्या जीवनाचा अभ्यास सर्व बाजूंनी करण्यात गैर काहीच नाही. पण, त्यांच्या विषयी आम्ही सांगतो तेच आणि त्याच भाषेत लिहा, असे सांगणे हुकूमशाहीचे लक्षण असून ते अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालणारे आहे.

या पुस्तकात पानसरे यांनी शिवाजी महाराजांना एका प्रगतिशील, लोकाभिमुख आणि सर्वधर्मसमभाव मानणाऱ्या राजाच्या रूपात मांडले. पानसरे यांचा दावा असा की, शिवाजी महाराजांचा लढा हा केवळ धार्मिक नव्हता, तर तो सामाजिक न्याय आणि स्वराज्य स्थापनेचा होता. शिवाजी महाराजांनी मुस्लिम सरदारांना उच्च पदे दिली, मशिदींचा आदर केला आणि धार्मिक सहिष्णुता पाळली. त्यामुळे त्यांना समाजसुधारक आणि सर्वसमावेशक राजा म्हणून पाहणे योग्य ठरते, असे पानसरे यांनी पुस्तकातून मांडले आहे. पुस्तकात पानसरे शिवाजी महाराजांना देव किंवा अवतारम्हणून न पाहता एक मानवी नेते, शेतकऱ्यांचा मुक्तिदाता, स्त्रियांचा आदर करणारा आणि अन्यायाविरुद्ध लढणारा योद्धा म्हणून मांडतात.

चारशे वर्षांपूर्वी घडलेल्या घटनेला आपण आजच्या चष्म्यातून पाहतो, केवळ इतिहास म्हणून पाहत नाही आणि हीच सर्वांत मोठी चूक ठरते. इतिहास हा केवळ भूतकाळाचा अभ्यास नसतो; तो वर्तमानातील राजकारणावरही प्रभाव टाकतो. अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात शिवाजी महाराजांचे नाव राजकीय भांडवल म्हणून वापरले जाते. त्यामुळे त्यांच्या प्रतिमेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न विविध गटांकडून होत असतो. छत्रपती शिवाजी महाराज हे उभ्या महाराष्ट्रासाठी अनुकरणीय आहेत. ते कुठल्या पक्षाची अथवा संघटनेची मक्तेदारी नव्हे. त्यामुळे असे प्रयत्न हाणून पाडले पाहिजेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे इतिहास कधीही एकांगी नसतो. शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्वही बहुआयामी होते. ते एक कुशल योद्धा होते. ते एक दूरदृष्टी असलेले प्रशासक होते. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात एका धमार्ला झुकते माप कधीही दिले नाही; उलट धार्मिक सहिष्णुता दाखवली. त्यांना केवळ एका चौकटीत बसवणे योग्य ठरत नाही. त्यांच्यासारख्या महान व्यक्तिमत्त्वाला एका विचारसरणीपुरते मर्यादित करणे अन्यायकारक आहे.

इतिहासाचा अभ्यास वस्तुनिष्ठ पद्धतीने करणे, विविध दृष्टिकोन स्वीकारणे, राजकीय हेतूंपासून इतिहास वेगळा ठेवणे, शैक्षणिक चचेर्ला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. इतिहास नेहमी बदलत असतो किंवा अधिक अचूकपणे सांगायचे तर, इतिहासाविषयीची आपली समज नेहमी बदलत असते. इतिहास पुन्हा लिहिणे म्हणजे घडून गेलेली घटना बदलणे नव्हे, तर नव्या परिप्रेक्ष्यातून ती घटना अधिक अचूकपणे समजून घेणे होय. हे आपल्याला कळेल तेव्हा इतिहासाकडे आपण अधिक वस्तुनिष्ठ पद्धतीने बघू शकू.

# योगक्षेमं वहाम्यहम...

मंत्रालयापासून जिल्हा परिषदेपर्यंत... सरकारी शाळेपासून राज्य वीज मंडळापर्यंत आणि याशिवायही कुठे कुठे, सरकारी नोकरीमध्ये एकदा का संधी मिळाली की तेथेच वयाच्या ५८व्या वर्षापर्यंत नोकरी करायची नि चांगल्या निवृत्तीवेतन ानिशी निवृत्त व्हायचे हा महाराष्ट्रासह देशभरातील लोकप्रिय शिरस्ता. हा शिरस्ता लोकप्रिय होण्यामागची महत्त्वाची कारणे दोन. एक - निवृत्तीपर्यंत कायमस्वरूपी नोकरीची हमी आणि दुसरे - निवृत्तीनंतरचे निवृत्तीवेतन. निवृत्तीपर्यंत कायमस्वरूपी नोकरीची हमी ही आजच्या काळातील दुर्मीळ गोष्ट. गेल्या सुमारे २५-३० वर्षांपासून कंत्राटी नोकरी हीच रूढ रीत झाल्याने कायमस्वरूपी नोकरी ही बाब आजच्या काळात अक्षरशः उंबराच्या फुलाइतकी दुर्मीळ; आणि निवृत्तीवेतन तर बहुसंख्यांच्या विचारविश्वाच्याही पलीकडचे! पण, ज्या सुदैवी लोकांच्या विचारविश्वात हे निवृत्तीवेतन आहे अशा राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकारने बुधवारी काढलेला जीआर ही महत्त्वाची भेट आहे. राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीत सुधारणा करून आखलेली नवीन सुधारित निवृत्तीवेतन योजना ही ती भेट. सन २००५ नंतर राज्य सरकारी सेवेत आलेले कर्मचारी-अधिकारी यांना ही योजना लागू असेल. बँकांमधील घटलेले व्याजदर, आर्थिक अनिश्चितता आदीच्या पार्श्वभूमीवर निवृत्तांसाठी निवृत्तीवेतन किती जिव्हाळ्याचा विषय असेल, याची कल्पना यावी. वास्तविक सन २००४पर्यंत लागू असलेल्या निवृत्तीवेतनातील तरतुदी याच प्रकारच्या होत्या. मात्र ती योजना बंद झाली. त्यानंतरच्या नव्या योजनेबाबत कर्मचाऱ्यांचे, संघटनांचे अनेक आक्षेप होते. त्यामुळे जुनीच योजना लागू करण्यासाठी अधेमधे आंदोलनेही झाली. गेल्या लोकसभा निवडणुकीवेळी महाराष्ट्रात जुनी योजना लागू करण्याचे आश्वासनदेखील देण्यात आले होते; मात्र हालचाल काहीच झाली नाही. अगदी गेल्याच महिन्यात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी केलेल्या संपामागील सर्वांत प्रमुख मागणी हीच होती. त्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार ती जवळपास पंधरवड्यातच मान्य झाली आहे. जे कर्मचारी ही ऐच्छिक योजना स्वीकारतील त्यांना निवृत्तीवेळी पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरणाकडे जमा असलेल्या रकमेपैकी ६० टक्के निधी सरकारला परत करावा लागेल. संबंधित कर्मचाऱ्याच्या निधनानंतर या रकमेच्या आधारे त्याच्या कुटुंबाला निवृत्तीवेतन मिळेल. या अटीबाबत काही घटकांनी नाराजी नोंदवत आक्षेप घेतलेला दिसतो. मात्र त्यास असलेला विरोध फार रेटला जाईल, अशी शक्यता कमीच.

# हिंदू धर्मातील १६ संस्कार



हिंदू धर्मात मानवाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत जीवन शुद्ध, संस्कारित आणि मूल्यपूर्ण व्हावे यासाठी १६ संस्कार सांगितले आहेत. ज्यांना ह्षोडश संस्कारह्न असे म्हणतात. हे संस्कार फक्त धर्मकांडासाठी केले जात नाहीत. तर प्रत्येक संस्काराचा उद्देश व्यक्तीचे शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक विकास करणे हा आहे.




**१. गर्भाधान संस्कार**

गभार्धान संस्कार हा १६ संस्कारापैकी पहीला संस्कार आहे. विवाहानंतर उत्तम, सद्गुणी आणि निरोगी संतती प्राप्त व्हावी म्हणून शारीरीक आणि मानसिक शुद्धीसाठी केला जाणारा संस्कार म्हणजे गभार्धान संस्कार. दांपत्याने शुद्ध मनाने आणि चांगल्या विचारांनी संततीची इच्छा व्यक्त करणे हा यामागील हेतू असतो.

**२. पुंसवन संस्कार**

गर्भधारणेनंतर तिसऱ्या महिन्यात हा संस्कार केला जातो. गभार्चे आरोग्य चांगले राहावे, बाळ निरोगी आणि बुद्धिमान व्हावे यासाठी देवाची प्रार्थना केली जाते. अनेक कुटुंबात आजही गर्भवती महिलेवर पुंसवन संस्कार केला जाते. त्यासाठी कुटुंबातील माणस एकत्र येऊन पूजा पाठ करतात.

**३. सीमंतोन्नयन संस्कार**

गर्भावस्थेच्या चौथ्या, सहाव्या किंवा आठव्या महिन्यात सीमंतोन्नयन संस्कार केला जातो. गर्भवती स्त्रीच्या मानसिक आनंदासाठी आणि गर्भाच्या रक्षणासाठी हा संस्कार केला जातो. यामध्ये आईला सकारात्मक वातावरण, प्रेम आणि आशीर्वाद दिले जातात. आपण याला डोहाळ जेवण म्हणतो.

**४. जातकर्म संस्कार**

सीमंतोन्नयन संस्कारानंतर बाळ जन्मला आल्यानंतर लगेच केला जाणारा संस्कार म्हणजे जातकर्म. नवजात बालकाचे स्वागत करून त्याच्या आरोग्य आणि दीघार्युष्यासाठी प्रार्थना केली जाते. काहीजण या संस्कारावेळी जन्मवेळेनुसार बाळाची कुंडलीही बनवतात.

**५. नामकरण संस्कार**

जन्मानंतर ठराविक दिवशी बाळाला नाव दिले जाते. नाव हे व्यक्तीच्या ओळखीचे प्रतीक असल्यामुळे शुभ आणि अर्थपूर्ण नाव निवडले जाते.

**६. निष्क्रमण संस्कार**

निष्क्रमण संस्कारात बालकाला प्रथमच घराबाहेर नेऊन सूर्य आणि निसगार्चे दर्शन घडवले जाते. यामुळे बालकाचा बाह्य जगाशी परिचय होतो.

**७. अन्नप्राशन संस्कार**

सहा महिन्यांनंतर बाळाला प्रथमच अन्न खाऊ घालण्याचा विधी म्हणजे अन्नप्राशन. यामध्ये बाळाच्या निरोगी वाढीसाठी प्रार्थना केली जाते.

**८. चूडाकर्म (मुंडन) संस्कार**

तीर्थस्थळी बालकाचे प्रथम केस काढले जातात. यामुळे शरीरशुद्धी, आरोग्य आणि चांगल्या विचारांची वाढ होते असे मानले जाते.

**९. कर्णवेध संस्कार**

बालकाचे कान टोचण्याचा संस्कार. आरोग्यदृष्ट्या आणि सौंदर्यदृष्ट्या याला महत्त्व दिले गेले आहे.

**१०. विद्यारंभ संस्कार**

बालकाच्या शिक्षणाची सुरुवात या संस्काराने होते. अक्षरओळख करून ज्ञानप्राप्तीच्या मार्गावर पहिले पाऊल ठेवले जाते. पूर्वीच्या काळात मुलांना गुरुकुल मध्ये ज्ञानप्राप्तीसाठी पाठवले जात असे. पण आता शाळांमध्ये पाठवले जाते.

**११. उपनयन संस्कार**

याला ह्मुंजह्व असेही म्हणतात. बालकाला शिक्षण, शिस्त आणि आध्यात्मिक जीवनासाठी तयार करण्याचा हा महत्त्वपूर्ण संस्कार आहे. यामध्ये यज्ञोपवीत धारण केले जाते.

**१२. वेदारंभ संस्कार**

उपनयनानंतर वेद आणि धार्मिक शिक्षणाचा प्रारंभ केला जातो. ज्ञान, नैतिकता आणि धमार्चे शिक्षण यामध्ये दिले जाते.

**१३. केशांत संस्कार**

शिक्षणाच्या पुढील टप्प्यात प्रवेश करताना हा संस्कार केला जातो. व्यक्तीच्या प्रौढत्वाकडे वाटचालीचे हे प्रतीक मानले जाते.

**१४. समावर्तन संस्कार**

गुरुकुलातील शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थी गृहस्थ जीवनात प्रवेश करण्यासाठी तयार होतो. हा संस्कार शिक्षणसमाप्तीचे प्रतीक आहे.

**१५. विवाह संस्कार**

स्त्री आणि पुरुषाने गृहस्थाश्रमात प्रवेश करून कुटुंब, समाज आणि धमार्ची जबाबदारी स्वीकारणे म्हणजे विवाह संस्कार. हिंदू धर्मात विवाहाला पवित्र बंधन मानले जाते.

**१६. अंत्येष्टि संस्कार**

मृत्यूनंतर केला जाणारा अंतिम संस्कार. शरीर पंचमहाभूतांमध्ये विलीन होते आणि आत्म्याच्या पुढील प्रवासासाठी प्रार्थना केली जाते.

**१६ संस्कारांचे महत्त्व**

हिंदू धर्मातील १६ संस्कार हे मानव जीवनाला योग्य दिशा देणारे आहेत. जन्मापासून मृत्यूपर्यंत प्रत्येक टप्प्यावर हे संस्कार व्यक्तीला शुद्ध विचार, चांगले आचरण आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी प्रेरित करतात.

# मंदिरात पादत्राणे का घालू नयेत?



मंदिरात देव विराजमान असतात. यामुळे हे देवतांचे पवित्र स्थान मानले जाते. जसे आपण घरात किंवा पूजास्थानी स्वच्छतेने जातो, तसेच देवासमोर नम्रता आणि आदर दाखवण्यासाठी मंदिरात बूट,चप्पल घालून जात नाही. स्वच्छता आणि पवित्रता-बाहेर चालताना पायांना धूळ, माती, जंतू लागतात. तर मंदिरात स्वच्छता राखणे खूप महत्त्वाचे असते. त्यामुळे पादत्राणे बाहेर काढल्याने मंदिर पवित्र आणि स्वच्छ राहते.

सकारात्मक उर्जा-हिंदू धर्मात मंदिर हे सकारात्मक उजेर्चे केंद्र मानले जाते. म्हणूनच मंदिरात अनवाणी पायाने गेल्यास सकारात्मक ऊर्जा शरीरात सहज प्रवेश करते.

तर पादत्राणे ही ऊर्जा अडवतात असे मानले जाते जमिनीचा स्पर्श झ बहुतेक मंदिरातील जमीन थंड आणि असते . यामुळे अनवाणी चालल्याने शरीराला थंडावा आणि शांतता मिळते

परंपरा आणि शास्त्र- मंदिरात अनवाणी जाणे ही प्राचीन काळापासूनची परंपरा आहे.

धार्मिक ग्रंथांमध्येही मंदिरात प्रवेश करताना शुद्धता आणि साधेपणा ठेवावा असे सांगितले आहे

मन एकाग्र होते-पादत्राणे काढल्याने आपण बाहेरील जगापासून थोडे वेगळे होतो. त्यामुळे मन शांत होते आणि भक्तीमध्ये लक्ष केंद्रित होते.

# देवपूजेत दिव्याचे महत्व आणि प्रकार

**हिंदुधर्मात** देवपूजेबरोबरच दिप प्रज्वलनाला विशेष महत्व आहे. कारण दिपक म्हणजे अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश. यामुळे आपण दिवसा आणि संध्याकाळी देवघरात दिवा लावतो. दिवा सकारात्मक उजेर्चे प्रतिक आहे. म्हणूनच पूजेत आणि आरतीमध्येही दिवा लावला जातो.

या दिव्याचे अनेक प्रकार असून मातीचा दिवा, पितळेचा दिवा, अष्टधातुचा दिवा,स्टीलचा दिवा, चांदीचा दिवा पूजेत वापरला जातो. या प्रत्येक दिव्याचा संबंध वेगवेगळ्या देवीदेवतांशी आहे. यामुळे प्रत्येक देवतेसमोर विशिष्ट पद्धतीचा दिवा लावला जातो.



**मातीचा दिवा- पणती**-हा पारंपारिक दिवा असून विशेषतः दिवाळीत वापरला जातो. मातीचा दिवा हा साधेपणा आणि पवित्रतेचे प्रतिक आहे.

**पंचमुखी दिवा**-यादिव्यात पाच वाती असतात. ज्या पंचतत्व म्हणजे पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाशाचे प्रतीक आहेत.

**तांब्या-पितळेचा दिवा-** हा दिवा टिकाऊ असतो आणि दररोजच्या पूजेसाठी वापरला जातो. यामुळे घरात सकारात्मक उर्जा वाढते.

**अखंड दिवा**-हा दिवा सतत पेटता ठेवला जातो. तो श्रद्धा, भक्ती आणि देवाच्या स्मरणाचे प्रतीक आहे.

**समई**-हा दिवा दक्षिण भारतात विशेष करून वापरला जातो. घरात सकारात्मक उर्जा ,समृद्धी आणि मंगल वातावरण असावे यासाठी देवघरात समई तेवत ठेवली जाते.

# देशातील प्रसिद्ध ऐतिहासिक मंदिर





**भारत** हा परंपरा आणि संस्कृती जपणारा देश म्हणून ओळखला जातो. तसेच प्राचीन मंदीर ही भारताची वेगळी ओळख आहे. आज आपण देशातील अशाच काही प्राचीन मंदीरांबद्दल जाणून घेणार आहोत.

**१. सोमनाथ मंदिर – पुनर्जन्माचे प्रतीक**



सोमनाथ मंदिर हे भगवान शिवाच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी पहिले मानले जाते. असे म्हणतात की चंद्रदेवाने भगवान शिवाची कठोर तपश्चर्या येथे केली होती. शिवाने प्रसन्न होऊन त्याला शापमुक्त केले आणि त्या ठिकाणी ह्सोमनाथह्व म्हणून वास केला. इतिहासात हे मंदिर अनेक वेळा आक्रमणांत उद्धवस्त झाले. विशेषतः मोहमद गझनीचे सोमनाथवरील आक्रमण प्रसिद्ध आहे. पण प्रत्येक वेळी हे मंदिर पुन्हा उभे राहिले. त्यामुळे सोमनाथ मंदिर भारतीय संस्कृतीच्या जिद्दीचे प्रतीक मानले जाते.

**२. कोणार्क सूर्य मंदिर – सूर्याच्या रथाची अद्भुत कथा**

१३व्या शतकात राजा नरसिंहदेव प्रथम यांनी हे भव्य मंदिर बांधले. मंदिराची रचना सूर्यदेवाच्या विशाल रथासारखी आहे. यात २४ मोठी चाकं आणि सात घोडे कोरलेले आहेत. लोककथेनुसार मंदिराच्या शिखरावर एक शक्तिशाली चुंबक बसवले होते, ज्यामुळे समुद्रातील जहाजांच्या दिशा बदलत असत. जरी याचा ऐतिहासिक पुरावा कमी असला तरी ही कथा आजही प्रसिद्ध आहे.

**३. बृहदेश्वर मंदिर – अभियांत्रिकीचा चमत्कार**

राजराज चौल प्रथम यांनी ११व्या शतकात हे मंदिर बांधले. मंदिराचा विशाल गोपुरम आणि शिखर एकाच दगडातून बनवले गेले आहे असे मानले जाते. विशेष गोष्ट म्हणजे मंदिराच्या मुख्य घुमटाची सावली जमिनीवर पूर्णपणे पडत नाही अशी लोकश्रद्धा आहे. हे मंदिर युनेस्को जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट आहे.

**४. जगन्नाथ मंदिर – भक्ती आणि रहस्य**

भगवान जगन्नाथ, बलभद्र आणि सुभद्रा यांच्या मूर्ती येथे पूजल्या जातात. मंदिराशी अनेक रहस्यकथा जोडलेल्या आहेत.

असे म्हणतात की मंदिराच्या शिखरावरील ध्वज नेहमी वाऱ्याच्या उलट दिशेने फडकतो. तसेच मंदिरावरून पक्षी उडताना दिसत नाहीत अशीही लोककथा प्रसिद्ध आहे. दरवर्षी होणारी रथयात्रा जगभरातील भक्तांना आकर्षित करते.

**५. कैलास मंदिर – एका दगडातून घडलेले आश्चर्य**

एलोरातील कैलास मंदिर हे संपूर्णपणे एका मोठ्या खडकातून कोरले गेले आहे. राष्ट्रकूट राजांनी हे मंदिर बांधले असे मानले जाते.

कथेनुसार एका राणीने नवस केला होता की राजा बरा झाल्यास ती मंदिराचे शिखर पाहिल्याशिवाय अन्न ग्रहण करणार नाही. तेव्हा शिल्पकाराने वरून खाली खोदकाम सुरू केले आणि अल्पावधीत शिखर तयार केले.

**६. पद्मनाभस्वामी मंदिर – गुप्त खजिन्याचे रहस्य**

हे मंदिर जगातील सर्वात श्रीमंत मंदिरांपैकी एक मानले जाते. मंदिरातील गुप्त तिजोऱ्यांमध्ये अमूल्य सोने, दागिने आणि प्राचीन वस्तू सापडल्या. एका बंद कक्षाबद्दल अनेक रहस्यकथा प्रचलित आहेत. असे मानले जाते की तो कक्ष उघडल्यास अनिष्ट घडू शकते.जगबुडी होऊ शकते.



# पूजेचे संपूर्ण फळ मिळण्यासाठी टाळा या सामान्य चुका



देवाची भक्ती करताना मन शुद्ध असणे जितकं महत्त्वाचे आहे, तितकचं पूजेची पद्धत योग्य असणंही गरजेचं आहे. सनातन धर्मात दररोज घरात पूजा करण्याचे महत्त्व सांगण्यात आलं आहे. त्यामुळे सकाळची अंघोळ झाल्यावर पूजा अर्चना दररोज घरात करण्यात येते. अनेक जण दररोज भक्तीभावाने पूजा करतात, पण नकळत काही सामान्य चुका घडतात. आज आपण पूजेचं संपूर्ण फळ मिळण्यासाठी पूजेत कोणत्या चुका टाळायला हव्यात, याबद्दल जाणून घेऊया.

**आसनाशिवाय बसणे**

जमिनीवर बसून थेट पूजा करू नये.पूजेसाठी कायम लोकरीचे आसन वापरावे.

**शिळी फुले अर्पण करणे**

देवाला नेहमी ताजी फुले वाहावीत. जमिनीवर पडलेली किंवा वाळलेली फुले कधीही देवाला अर्पण करू नयेत.

**तुळशीची पाने तोडण्याचे नियम**

अंघोळ न करता किंवा संध्याकाळी तुळशीची पाने तोडू नयेत.

**गणपतीला तुळस वाहणे**

गणपती बाप्पाच्या पूजेत विसरूनही तुळस वाहू नये. दुर्वा वाहावा.

**खंडित मूर्तीची पूजा**

घरात कधीही खंडीत किंवा तडा गेलेली मूर्ती ठेवू नये. अशी मूर्ती तुमच्या घरात असेल तर तिचे विसर्जन करावे.

**स्वच्छतेचा अभाव**

पूजेची भांडी किंवा देव्हारा अस्वच्छ ठेवणे ही सर्वात मोठी चूक आहे. पूजेसाठी लागणारी तांब्याची भांडी नेहमी घासून स्वच्छ ठेवावीत.कधीही अस्वच्छ भांडी पूजेसाठी वापरू नयेत.

**आरती करताना चुका**

आरती करताना ती पूर्ण श्रद्धेने करावी. आरती करताना मध्येच बोलणे किंवा अर्धवट सोडून उठणे टाळावे.

# तीर्थयात्रा आणि आध्यात्मिक उन्नती

आजच्या वेगवान जीवनात प्रत्येक व्यक्ती मानसिक ताण तणावातून जात आहे. अशा परिस्थितीत जर तुम्ही थोडावेळ अध्यात्माच्या सहवासात गेलात तर मनशांतीच नाही तर तुमचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोनही बदलू शकतो. म्हणूनच हिंदू धर्मात तीर्थयात्रेला विशेष महत्व आहे. पण काहीजण तीर्थयात्रेला केवळ मनोरंजन किंवा वेळ घालवण्यासाठी जातात. त्यामुळे तीर्थयात्रेचा खरा उद्देश आणि महत्त्व कमी होत चालले आहे. तीर्थयात्रा का केली जाते आणि तिचा खरा उद्देश काय आहे, हे आधी समजून घेणे आवश्यक आहे. कारण तीर्थयात्रा म्हणजे पवित्र स्थळांना भेट देणे, ज्यामुळे आत्म्याची शुद्धी आणि मानसिक शांती मिळते. तीर्थयात्रा आपल्याला शिस्त, सहनशीलता आणि सकारात्मक ऊर्जा देते. तीर्थयात्रा केवळ आध्यात्मिक ज्ञान वाढवत नाही, तर जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलते. म्हणूनच धार्मिक स्थळांच्या यात्रेचे स्वतःचे वेगळे महत्त्व आहे. आपल्याकडे तीर्थस्थळे मंदिरे, नद्या, घाट, धाम अशा विविध स्वरूपात असतात. लोक त्या ठिकाणी जाऊन स्नान करतात, देवदर्शन घेतात आणि दान-पुण्य करतात. यामागे पापमुक्ती, जन्म-मृत्यूच्या बंधनातून मुक्ती ही भावना असते. पण त्याचबरोबर तीर्थयात्रा करण्याचे अजूनही वेगळी कारणेही आहेत. ऊर्जा-ईश्वर सगळीकडे आहे. पण तरीही तीर्थस्थळांचेही वेगळे महत्व आहे. कारण जिथे आपण विशिष्ट कार्य करतो, तिथे त्या प्रकारची ऊर्जा, भावना आणि वातावरण निर्माण होते. तीर्थस्थळांवर सकारात्मक आणि पवित्र ऊर्जा अधिक प्रमाणात असते. त्यामुळे तेथे गेल्यावर मन शांत होते आणि आध्यात्मिक भावना जागृत होतात.

- आरोग्य-तीर्थयात्रा आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. तीर्थस्थळांचे वातावरण स्वच्छ आणि निसर्गरम्य असते. चालणे, पायऱ्या चढणे-उतरणे आणि भजन-कीर्तन यामुळे शरीराला व्यायाम मिळतो. सात्त्विक आहारामुळे पचन सुधारते आणि आरोग्य चांगले राहते.
- ज्ञानवृद्धी-तीर्थयात्रेमुळे आध्यात्मिक, भौगोलिक आणि ऐतिहासिक ज्ञान वाढते. विविध ठिकाणांची संस्कृती, परंपरा आणि इतिहास जाणून घेता येतो. लोकांशी संवाद साधून नवीन माहिती मिळते.
- सामाजिक संबंध-तीर्थयात्रेमुळे नवीन लोकांशी ओळख होते. विविध भाषा, संस्कृती, परंपरा समजतात. वसुधैव कुटुंबकम ही भावना वाढीस लागते. परस्पर सहकार्य, दया, करुणा आणि सहनशीलता यांसारखे गुण विकसित होतात.
- आध्यात्मिक शुद्धी - गंगा, काशी, तिरुपती यांसारख्या पवित्र स्थळांना भेट दिल्याने मन व आत्मा शुद्ध होतो असे मानले जाते.
- पुण्यप्राप्ती - तीर्थयात्रेमुळे पापांचा नाश होऊन पुण्य मिळते, अशी श्रद्धा आहे.
- भक्तीभाव वाढतो- देवदर्शन आणि पूजेमुळे श्रद्धा व भक्ती अधिक दृढ होते.
- मोक्षप्राप्तीची भावना - काही तीर्थस्थळांना भेट दिल्याने जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्ती (मोक्ष) मिळते, असे मानले जाते.
- संस्कृतीचे जतन - तीर्थयात्रेमुळे परंपरा, संस्कार आणि धार्मिक एकता टिकून राहते.
- मानसिक शांती - तीर्थयात्रेमुळे मन प्रसन्न होते आणि तणाव कमी होतो.

म्हणूनच, हिंदू धर्मात तीर्थयात्रा ही केवळ प्रवास नसून ती आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि मानसिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

# व्यवसाय परवाना नसलेली दुकाने सील करा; अतिक्रमणाविरोधात स्थायी समितीकडे मागणी

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

तावडे हॉटेल ते गांधीनगर परिसरातील महापालिकेच्या हद्दीत आलेल्या जागेवरील बांधकामांना पुन्हा नोटीसा द्यायची काय गरज आहे. यापूर्वी नोटीसा दिल्या आहेत ना? या ठिकाणी व्यवसाय सुरु आहेत. मग परवाना विभागाने त्याच्यावर काय कारवाई केली. परवाना नसेल तर तत्काळ सर्व व्यवसायधारकांची दुकाने सील करा. परवाना विभागामार्फत आतापर्यंत का कारवाई केली नाही. तातडीने सर्व दुकाने सील करा. तसेच महापालिकेचा रीतसर परवाना द्या, अशी मागणी इंद्रजीत बोंद्रे, आदिल फरास, प्रवीण सोनवणे, अमर समर्थ यांनी केली. व्यवसाय परवाना विषयावरून अधिकाऱ्यांना धारेवर धरण्यात आले. विशेष म्हणजे पहिल्यांदाच स्थायी समितीची सभा शांततेत झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले. शुक्रवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये आठ विषयांवर चर्चा झाली.



**प्रशासनाने दिली माहिती**

आयआरबीचे ४५ किलोमीटरचे रस्ते स्वच्छतेसाठी महापालिकेकडे मनुष्यबळ कमी असलेने स्वतंत्र एजन्सीमार्फत हे रस्ते स्वच्छ करता येते का याची पडताळणी करु नवीन स्विपी गमशीन चालविण यचे स्वतंत्र प्रशिक्षीत ड्रायव्हर घेणे आवश्यक आहे. आहे त्या ड्रायव्हरकडून काम केलेस मशनरी खराब होऊ शकते. महापालिकेला ८ स्विपीग मशीन प्राप्त होत आहेत. सदरची कंपनी महापालिकेच्या चालकाला प्रशिक्षण देणार आहेत. तरीही देखभाल दुरुस्तीच्या ड्रायव्हरसह देखभालीचा प्रस्ताव कंपनीकडून मागणी केलेला आहे, अशी माहिती प्रशासनाने दिली.

**स्थायी समिती सभेमध्ये विविध विषयांवर झाली चर्चा**

सीएसआरच्या माध्यमातून नागरी सुविधा केंद्रात एचडीएफसी बँकेमार्फत मनुष्यबळ नियुक्ती करुन देणेव्या प्रस्तावावर चर्चा होऊन इतर बँकाकडूनाही तसा प्रस्ताव मागवून फेरप्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अमर समर्थ यांनी नाल्यातील गाळ काढल्यानंतर तो काठावर ठेवल्यानंतर तो उठाव केला जात नाही, गाळ उठाव करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा भाड्याने घेण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. पावसाळा सुरू होण्यासाठी अवघे पंधरा दिवस उरले आहेत. हे काम दोन महिने अगोदर का केले नाही.

असा जाब हे नगरसेवकांनी प्रशासनाला विचारला. त्याला प्रज्ञा उत्तुरे यांनी समर्थन दिले. महापालिकेमार्फत मनुष्यबळाद्वारे व दोन पोकलॅन्ड मशिनमार्फत २० मार्च पासून नाले सफाई सुरु आहे. ४० कर्मचा-यांमार्फत कर्मचा-यांमार्फ लहान मोठे नाल्यांची स्वच्छता सुरु आहे. शहरातील मुख्य रस्त्याचे गटर्स, स्ट्रॉम वॉटर, पेव्हिंग ब्लॉक खराब झाले आहे. काही ठिकाणी गटर्स आहे परंतू पुढे पाणी जाण्यासाठी मार्ग नाही. त्यासाठी ज्या त्या विभागाने पाहिले पाहिजे आदी विसयांवर चर्चा झाली.

**दुधाळी शूटिंग रेंज येथे रात्री गार्डन नेमावेत**

महापालिका विभागीय कार्यालयामार्फत दुधाळी येथे सुरक्षेचे नियोजन करावे. दुधाळी शुटिंग रेंज येथे रेंजचे साहित्य आहे. याठिकाणी रात्रीचे बरेचसे अवैध धंदे सुरु असतात. त्यामुळे या ठिकाणी स्वतंत्र गार्ड नेमावा, अशी मागणी प्रतापसिंह जाधव यांनी केली. यावर गार्ड नेमण्याची व्यवस्था करू, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**अतिक्रमण काढल्यानंतर पुन्हा परवानगी देतात का?**

शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी अतिक्रमण काढले जाते. त्याठिकाणी परत लावण्यासाठी परवानगी दिली जाते का? असा सवाल अनुराधा खेडकर यांनी विचारला. यावर चारही विभागीय कार्यालयामार्फत स्वतंत्र अतिक्रमणची पथके करण्यात येत आहे. ही पथके सहाय्यक आयुक्तांच्या नियंत्रणाखाली त्या त्या विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कारवाई करतील.

# अवकाळी पावसाने जव्हार तालुक्यात मोठे नुकसान




■ **जव्हार। प्रतिनिधी,**

तालुक्यात गुरुवारी सायंकाळी झालेल्या अवकाळी पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे घरांसह आंबा व काजू पिकांचे मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी झाडांवरील फळे गळून पडली असून काही घरांचे पत्रे उडाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात तीव्र उष्णतेचे वातावरण होते. मात्र अचानक हवामानात बदल होऊन ढगाळ वातावरण निर्माण झाले आणि सायंकाळच्या सुमारास जोरदार वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसाचा सर्वाधिक फटका काढणीच्या अंतिम टप्प्यात असलेल्या आंबा व काजू उत्पादकांना बसला आहे. तालुक्यातील विविध भागांतील बागांमध्ये मोठ्या प्रमाणात आंबा व काजूची फळे झाडावरून खाली पडली. काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटल्यानेही नुकसान झाले. तसेच बाजारपेठेत विक्रीसाठी ठेवलेला माल भिजल्याने त्याच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे. परिणामी, हंगामाच्या अखेरीस अपेक्षित उत्पन्नावर पाणी फिरल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. दरम्यान, जोरदार वाऱ्यामुळे काही ठिकाणी घरांचे पत्रे उडून नुकसान झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नसली तरी नागरिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त भागांची तातडीने पाहणी करून पंचनामे करण्यात यावेत तसेच बाधित शेतकरी व नागरिकांना शासनाकडून त्वरित आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. वसई-विरार पट्ट्यात सलग सापडणारे मृतदेह ही गंभीर बाब ठरत असून, या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांकडून कडक उपाययोजना आणि देखरेख वाढवण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. मे २०२६ च्या सुरुवातीला पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात अवकाळी पाऊस आणि जोरदार वादळी वाऱ्यामुळे आंबा व काजू पिकांचे मोठे नुकसान झाले आहे, तसेच अनेक घरांचे पत्रे उडाल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी व बागायतदारांचे अतोनात नुकसान झाले असून पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. अवकाळी पावसाचा जव्हारवरील परिणामःकृषी नुकसानः काढणीच्या अंतिम टप्प्यात असलेल्या आंबा व काजू बागांवर सर्वाधिक परिणाम झाला आहे. वादळामुळे मोठ्या प्रमाणात फळगळ झाली असून, झाडांच्या फांद्याही तुटल्या आहेत.मालमत्तेचे नुकसानः जोरदार वाऱ्यामुळे अनेक ग्रामीण घरांचे पत्रे उडाले असून, काही ठिकाणी झाडे कोलमडली आहेत. वीज व जनजीवनः पावसामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला होता आणि लग्नकार्यासाठी आलेल्या नागरिकांची गैरसोय झाली.पंचनामे सुरूः प्रशासनाने नुकसानग्रस्त भागाचे तातडीने पंचनामे सुरू करण्याचे निर्देश दिले असून, शेतकरी नुकसान भरपाईच्या प्रतीक्षेत आहेत. गेल्या काही दिवसांतील तीव्र उष्णतेनंतर अचानक हवामानात बदल होऊन हा अवकाळी पाऊस झाला आहे.

# ‘मुस्लिम नागरिकांना आम्ही घरं देणार नाही’ ; कोनगावात अजब फतवा

■ **ठाणे । प्रतिनिधी,**

आम्ही मुस्लीम नागरिकांना घरं देणार नाही असा अजब फतवा काढल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. कल्याणमध्ये घर विक्री संदभार्तील एका फोन कॉलवरून नवा वाद निर्माण झाला आहे. मुस्लिम नागरिकांना घर विकली जाणार नाही हे ऐकताच एम आय एम शहराध्यक्ष अश्फाक शेख यांनी बाजारपेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. शुक्रवारी दुपारी अश्फाक शेख यांना एका व्यक्तीचा फोन




आला. संबंधित व्यक्तीने कोनगाव परिसरातील महामार्गालगत असलेल्या एका इमारतीबाबत माहिती देत स्वस्त दरात घर उपलब्ध असल्याचे सांगितले. घराची किंमत, पेमेंट क्षमता आणि इतर तपशीलांवर दोघांमध्ये चर्चा झाली. त्यानंतर अश्फाक शेख यांनी या ठिकाणी मुस्लिम लोकांना घर मिळेल का? असा प्रश्न विचारला. यावर समोरच्या व्यक्तीने मुस्लिम लोकांना घर मिळणार नाही असे स्पष्ट सांगितल्याचा आरोप करण्यात आला आहे. हे उत्तर ऐकल्यानंतर संतप्त झालेल्या अश्फाक शेख यांनी संबंधित व्यक्तीला, ‘माझं नाव आणि नंबर माहिती असताना मला फोन कसा केला?’ असा सवाल केला. त्यानंतर फोन करणाऱ्या व्यक्तीने दिलगिरी व्यक्त करत कॉल कट केल्याचे सांगितले जात आहे. या घटनेनंतर अश्फाक शेख यांनी बाजारपेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून संबंधित व्यक्तीची ओळख, तो ज्या बिल्डर किंवा प्रोजेक्टचे नाव घेत होता त्याची सत्यता, तसेच या प्रकरणामागे आणखी कोण आहे का याची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली आहे. ‘मुस्लिम लोकांना घर मिळणार नाही असे सांगणारे नेमके कोण आहेत?’ असा सवालही कल्याण शहर एम आय मध्ये अध्यक्ष अश्फाक शेख यांनी उपस्थित केला आहे. आता या प्रकरणात पोलिस कोणती भूमिका घेतात आणि चौकशीत काय निष्पन्न होते याकडे लक्ष लागले आहे.

# ऑरेंज गेट बोगदा प्रकल्पाला गती; भूमिगत खोदकामाचे २५० मीटर अंतर पूर्ण

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि पूर्व-पश्चिम जोडणी अधिक वेगवान करण्यासाठी उभारल्या जात असलेल्या ऑरेंज गेट भूमिगत बोगदा प्रकल्पात महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात तब्बल २५० मीटर भूमिगत खोदकाम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहे. या कामासाठी अत्याधुनिक स्लरी शिल्ड टनेल बोरिंग मशीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. तसेच कायमस्वरूपी टनेल लाइनिंग रिंग बसवण्याचं कामही पूर्ण करण्यात आलं आहे. बोगद्याच्या संरचनात्मक स्थिरतेसाठी हा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. MMRDA ने दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकल्प मुंबईतील सर्वाधिक दाट लोकवस्ती आणि संवेदनशील पायाभूत सुविधांच्या परिसरातून जात आहे. त्यामुळे भूमिगत खोदकाम करताना अत्यंत अचूक नियोजन आणि सुरक्षा उपायांची आवश्यकता होती. MMRDA आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी सांगितले की, देशातील सर्वाधिक गर्दीच्या शहरी परिसराखाली भूमिगत बोगद्याचं काम करणं ही मोठी अभियांत्रिकी आव्हानात्मक प्रक्रिया आहे. या प्रकल्पातील प्रगती ही शिस्तबद्ध नियोजन आणि तांत्रिक क्षमतेचं उदाहरण आहे. मुंबईत जमिनीवरील रस्ते विस्तारासाठी मर्यादित जागा उपलब्ध असल्याने भूमिगत वाहतूक प्रकल्पांना अधिक महत्त्व दिलं जात आहे.

# जे. जे. ला मिळणार ब्रॉन्कोस्कोप प्रणाली! इंडियन ऑईलच्या सीएसआर उपक्रमातून दर्जेदार उपचाराची सोय




■ **मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवांना अधिक सक्षम आणि आधुनिक करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या सीएसआर उपक्रमांतर्गत मुंबईतील सर जे. जे. हॉस्पिटल येथे अत्याधुनिक हाय-डेफिनिशन व्हिडिओ ब्रॉन्कोस्कोप प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार उपचार उपलब्ध करून देण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्न शील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. सर जे. जे. रुग्णालयातील फुप्फुस विकार विभागामध्ये दरमहा सुमारे ७० ते ८० ब्रॉन्कोस्कोपी प्रक्रिया केल्या जातात. क्षयरोग, विशेषतः औषध-प्रतिरोधक क्षयरोग, फुफ्फुसाचा कर्करोग, इंटरस्टिशियल लंग डिसीज आणि श्वसनमार्गातील अडथळे यांसारख्या गंभीर आजारांचे लवकर निदान करण्यासाठी ब्रॉन्कोस्कोपी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मात्र, जुन्या आणि कालबाह्य उपकरणांमुळे वेळेवर आणि अचूक निदान करण्यात अडचणी येत होत्या. याच पार्श्वभूमीवर इंडियन ऑइलने सीएसआरच्या माध्यमातून हाय-डेफिनिशन व्हिडिओ ब्रॉन्कोस्कोप प्रणाली उपलब्ध केली आहे.

नव्या प्रणालीचे फायदे काय ?

या नव्या प्रणालीमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना खासगी रुग्णालयांमध्ये महागड्या तपासण्यांसाठी जाण्याची गरज कमी होणार असून सरकारी आरोग्य व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होणार आहे. श्वसनविकारांच्या उपचारामध्ये ही सुविधा महत्त्वाची ठरणार आहे.त्यामुळे रुग्णालयाच्या निदान क्षमतेत मोठी वाढ होणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे श्वसनविकारांचे अचूक आणि जलद निदान शक्य होईल, तसेच गंभीर रुग्णांवर वेळेत उपचार सुरू करण्यास मदत मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाचे स्वागत करताना सांगितले की, राज्य शासनाच्या आरोग्यक्षेत्रातील सुधारणांना विविध उद्योगसमूह आणि सार्वजनिक उपक्रमांचे सहकार्य लाभत आहे. इंडियन ऑइलच्या या उपक्रमामुळे गरीब आणि गरजू रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा सरकारी रुग्णालयातच उपलब्ध होतील. लवकर निदान आणि वेळेत उपचार यामुळे अनेकांचे प्राण वाचविण्यास मदत होईल.

# नवी मुंबईकरांनो पाणी जपून वापरा, मोरबे धरणात ८५ दिवस पुरेल इतकाच जलसाठा

■ **नवी मुंबई। प्रतिनिधी,**

पालिकेच्या स्वतःच्या मालकीच्या मोरबे धरण प्रकल्पातून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रास पाणीपुरवठा केला जात असून हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार यावर्षी ह्यएल-निनोह्ण या जागतिक हवामान बदलामुळे भारतातील मोसमी वाऱ्यावर परिणाम होऊन सरासरी पावसाचे प्रमाण ९२ टक्के ते ९४ टक्के इतके राहणार आहे तसेच पावसालाही उशीर सुरू होणार असल्याचे अंदाज नुकतेच वर्तविण्यात आले आहेत. मोरबे धरण क्षेत्रात अजून ८५ दिवस पुरेल एवढा पाणीसाठा असून हवामानखात्याच्या अंदाजानुसार यावर्षी पर्जन्यमान नेहमीपेक्षा ६ ते ८ टक्के कमी असेल आणि पाऊस उशीरा सुरू होईल ही परिस्थिती लक्षात घेता नवी मुंबईकर नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन पालिका




आयुक्त डॉ.कैलास शिंदे केले आहे.

पालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी मोरबे धरण प्रकल्पस्थळी भेट देऊन जलसाठ्याची प्रत्यक्ष स्थिती जाणून घेतली त्यासोबतच जलाशयाच्या दोन्ही बाजूने संपूर्ण परिसराची पाहणी करीत जमिनीची मोजणी व सीमांकन निश्चित करून आवश्यक त्या ठिकाणी तत्परतेने कुंपण घालण्याचे निर्देश दिले. याप्रसंगी आयुक्तांसमवेत अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, मालमत्ता विभागाचे उपायुक्त भागवत डोईफोडे, अतिक्रमण विभागाचे उपायुक्त संजय शिंदे, उद्यान विभाग उपआयुक्त स्मिता काळे, कार्यकारी अभियंता संतोष उनवणे आणि संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. मोरबे धरणातील पाणीसाठ्याच्या प्रत्यक्ष पाहणीप्रमाणेच मोरबे धरण क्षेत्राच्या कक्षेतील जमिनीचीही पाहणी करीत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी ही जमीन संरक्षित करण्याच्या दृष्टीने तत्पर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

# रबाळे, ऐरोली, घणसोली नशामुक्त करणार; पोलीस आयुक्तांचे लोकप्रतिनिधींना आश्वासन

■ **नवी मुंबई। प्रतिनिधी,**

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी रबाळे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रबाळे, ऐरोली आणि घणसोली परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, नगरसेविका व नगरसेवक यांची विशेष बैठक घेत नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. सदर बैठकीमध्ये नागरिकांनी रबाळे, ऐरोली व घणसोली परिसरामध्ये वाढत असलेल्या अंमली पदार्थ विक्री व सेवन करर्णाया इसमांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी केली. नागरिक व लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या समस्यांवर प्रभावी उपाययोजना कशा प्रकारे करता येतील याबाबत सविस्तर विचार विनिमय केला. रबाळे, ऐरोली, घणसोली परिसर नशामुक्त करुन नागरिकांना सुरक्षित ठेवण्यासाठी नवी मुंबई पोलीस कार्यरत राहतील, अशी ग्वाही पोलीस आयुक्तांनी दिली. सदर बैठकीस शिवसेना गटनेते नगरसेवक मनोज हळदणकर, नगरसेवक बंडू केणी, अंकुश सोनावणे, नगरसेवक आकाश मडवी, साहिल चौगुले, अनिकेत म्हात्रे, नगरसेविका वैशाली रेवेंद्र पाटील, ऐश्वर्या अंकुश सोनवणे, हेमांगी अंकुश सोनवणे, श्रेया सुदर्शन जिरगे, पूजा राजू पाटील त्याच प्रमाणे मीनाक्षी दांगट, डॉ.शिल्पा केशवाणी, डॉ. निशिकांत बर्फे, डॉ.सचिन पाटील, समाजसेवक सुधीर कुमठेकर, गगनदीप कोहली आदी उपस्थित होते. पोलीस आयुक्तांनी नागरिकांना नवीन बी.एन.एस. कायद्याबाबत माहिती दिली तसेच अमली पदार्थ विरोधी कारवाई, सायबर गुन्हे प्रतिबंधक उपाययोजना व नवी मुंबई पोलिसांमार्फत राबविण्यात येर्णाया विविध उपक्रमांची माहिती नागरिकांसमोर मांडली.

# शहरातून बाहेर पडताच भुर्दंड बसणार! 9 वर्षांनंतर पुन्हा सुरू होणार खारेगाव टोलनाका; मुंबई-नाशिक महामार्गावर टोलवसुली

■ **ठाणे । प्रतिनिधी,**

मुंबई- नाशिक महामार्गावरील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण अशा माजिवडा - वडपे मागार्ची सर्व प्रलंबित कामे पावसाळ्याआधी मे महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन एमएसआरडीसीने केले आहे. हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अंतर्गत येत असल्याने त्यावर आता खारेगाव येथे पुन्हा एकदा टोलनाका उभारत टोलवसुलीच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. हा टोलनाका सुरू असल्यास ठाणे जिल्ह्यामधील हजारो वाहनांना भुर्दंड बसण्याची भीती व्यक्त होत असून या विरोधात मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. या टोलनाक्यावरून पुन्हा राजकीय आंदोलनाचा भडका उडण्याची शक्यता आहे. सन १९९८मध्ये खारेगाव टोलनाका सुरू झाला होता. या टोलवसुलीविरोधात विविध राजकीय पक्षांनी आंदोलने केली. मे, २०१७मध्ये हा टोलनाका कायमस्वरूपी बंद करण्यात आला. या रस्त्याच्या उभारणीचा आणि देखभालीचा खर्च वसूल झाल्याचे आयआरबी कंपनीने स्पष्ट केल्यानंतर तत्कालीन सरकारने हा टोलनाका बंद करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे ठाणे, भिवंडी, कल्याण, नाशिक आणि उरण जेएनपीए येथील हजारो वाहनचालकांना टोलपासून मुक्तता मिळाली होती. ही वसुली बंद होऊन नऊ वर्षे पूर्ण होत असतानाच आता नवा माजिवडा-वडपे प्रकल्प पूर्ण होताच टोलवसुली केली जाणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com